Impact Factor : 3.4052(UIF)
Volume - 5 | Issue - 1 | July – 2015

अरूण मिरजकरांच्या साहित्यातील आंबेडकरी स्पंदने

शशिकांत खिलारे

सारांश :

फुले-आंबेडकरी प्रेरणेने लेखन करणाऱ्या आजच्या नव्या दमाच्या लेखकांमध्ये अरूण मिरजकरांचे नाव ठळकपणे समोर येते. त्यांनी 'फिरकी' या आत्मकथनात्मक कादंबरीपासून लेखनाला आरंभ केला असला तरी त्यांनी कथा, कविता आणि नाटक या वाङ्मय प्रकारामधून लेखन केले आहे. समकालीन वास्तवाचे भान ठेवून लेखन करणाऱ्या नाटककारामध्ये त्यांची गणना केली जाते. फुले-आंबेडकरी विचारधारा केंद्रस्थानी ठेवून त्यांनी लेखन केले आहे. त्यांच्या पहिल्याच 'फिरकी' या कादंबरीमधून आंबेडकरी विचारामधील शिक्षणाचे महत्व, आपल्या मूलभूत हक्कांसाठी संघर्ष करणे, स्त्री प्रतिष्ठा यासारख्या पैलूंचे दर्शन घडते. त्यांनी, 'दि पिलर ऑफ सोशल डेमॉक्रसी', 'जोती म्हणे', 'निब्बाण', 'केसं', 'डॉलर', 'ब्लॅक नाईटस' इत्यादी नाटकांचे लेखन करून ही सर्व नाटके रंगभूमीवर आणली आहेत. त्यांच्या या नाट्यलेखनामधून स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या बरोबरच माणुसकी ही मूल्ये अधोरेखित होत आहेत. अरूण मिरजकर समकालीन प्रश्नांना भिडताना मानवमुक्तीचा विचार घेऊन समाजातील वाईट, अन्यायी प्रवृत्तीचा दंभस्फोट करताना दिसतात. तसेच ते आपल्या साहित्य कृतीमधून जागतिक प्रश्नांची मांडणी करून समाजाचे लक्ष वेधून घेतात. त्यामुळे अरूण मिरजकरांच्या साहित्यात फुले-आंबेडकरी जाणिवा प्रभावीपणे प्रकट होताना दिसतात.

Short Profile

Shashikant Khilare
Head of the Marathi Department at Miss Champaben Bhalachand Women's College, Sangli .

प्रास्ताविक :-

१४ ऑक्टोंबर १९५६ च्या धम्मक्रांतीनंतर मराठी साहित्यात समाजातील विविध घटकांनी आपापल्या भाव-भावना साहित्य आणि कलेच्या क्षेत्रात अधिक जोमदारपणे मांडण्यास सुरूवात केली. धम्मक्रांतीपूर्वीही जोतीराव फुल्यांच्या प्रेरणेने समाजातील उपेक्षित, वंचित समाजघटकांनी साहित्याच्यामाध्यमातून आपापल्या भाव-भावना मांडल्या होत्या. पण हा साहित्य प्रवाह फारच क्षीण स्वरूपाचा होता. धम्मक्रांतीनंतर मात्र तो अधिक प्रबळ आणि जोरकसपणे साहित्याची निर्मिती करू लागला. यास फुले-आंबेडकरी विचारांची उर्जा प्राप्त झाली. त्यामुळे जागतिक पातळीवर सुध्दा या साहित्याची दखल घेतली गेली आहे. या साहित्याने उपेक्षित, वंचित, आदिवासी, दलित, ग्रामीण, स्त्री अशा समाजातील विविध घटकांना लिहिते केले. फुले आंबेडकरी विचारांचा वैचारिक वारसा या प्रवाहाच्या मुळाशी असल्याचे दिसून येते. या प्रवाहातील 'अरूण मिरजकरांच्या साहित्यातील आंबेडकरी स्पंदने' याचा शोध प्रस्तुत शोध निबंधातून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

कादंबरीमधील आंबेडकरी जाणिवा :-

अरूण मिरजकर हे आजच्या काळात लेखन करणारे लेखक आहेत. त्यांना समकालीन वास्तवाचे भान आहे. त्यामुळेच त्यांच्या कादंबरी, नाटक, एकांकिका या साहित्य प्रकारामधून आंबेडकरी जाणिवा जाणवतातच पण 'ते आपल्या साहित्यकृतीमधून जागतिक प्रश्नांची मांडणी करून समाजाचे लक्ष वेधून घेतात.'[१] हे अत्यंत महत्वाचे आहे. अरूण मिरजकरांनी प्रारंभी 'फिरकी' या नावाची आत्मकथानात्मक स्वरूपाची कादंबरी लिहिली आहे. ही कादंबरी मराठी साहित्यातील आंबेडकरी प्रेरणेच्या कादंबरीच्या परंपरेशी नाते सांगत आहे. केशव मेश्रामांच्या 'हकिकत आणि जटायू', दया पवारांचे 'बलुतं', शरण कुमार लिंबाळेंचे 'अक्करमाशी' या परंपरेमध्ये स्वतःचे वेगळे आणि वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण करण्याचे काम 'फिरकी' या आत्मकथनात्मक कादंबरीने केले आहे. 'फिरकी' या कादंबरीतील नायक उपेक्षित वंचित अशा मातंग समाजाचे प्रतिनिधीत्व करतो. या समाजात

मराठी विभाग प्रमुख श्रीमती चंपाबेन बालचंद शाह महिला महाविद्यालय सांगली.

शिक्षणाचे प्रमाण अत्यंत अल्प असल्यामुळे या समाजातून साहित्य निर्मितीही फारच कमी प्रमाणात निर्माण झालेली आहे. परंतु अण्णाभाऊ साठे, उत्तम बंडू तुपे, आर. के. त्रिभुवन या लेखकांनी मात्र मराठी साहित्य विश्वात समाजाचे अत्यंत वास्तवदर्शी चित्र मांडले आहे. अण्णाभाऊ साठे यांनी मराठी साहित्याला समृध्द करताना स्वतःचे वैशिष्ट्यपूर्ण स्थान निर्माण केले आहे. याच परंपरेतून अरूण मिरजकरांनी फिरकीतून मांतग समाजाच्या व्यथा, वेदना, संघर्ष नव्या जाणिवेने शब्दबध्द केलेल्या आहेत. या कादंबरीतील नायक पांडुरंग अत्यंत कष्ट करून मातंग समाजातील पारंपरिक दोरखंड वळून आपल्या भावी पिढीच्या शिक्षणाचे स्वप्न पाहतो व हे स्वप्न तो पुढील काळात पूर्णही करतो. परंतु या काळामध्ये ग्रामीण भागातील गावगाड्यातील जातीय ताण-तणावांच्या संघर्षाला तो सामोरे जातो. त्याचा तो निर्भयपणे मुकाबला करत आपल्या अस्मितेचा लढा उभा करतो. यासाठी पांडुरंगने आपला मुलगा आनंदास शिकवून साहेब केले. शिक्षणाशिवाय जाणीव जागृती होणार नाही याची पाडुंरंगला कल्पना होती. आंबेडकरी चळवळीने शिक्षणला अत्यंत महत्व दिले होते. आपल्या हक्कांसाठी संघर्ष केलाच पाहिजे या विचारांनी जागृत झालेला पाडुंरंग आपल्या अस्मितेसाठी संघर्षाला तयार होतो. गावामध्ये सवर्ण विरूध्द मातंग असा संघर्ष उभा राहतो. या संघर्षाचे मूळ माणसाला जीवन जगण्यासाठी हव्या असणाऱ्या मुलभूत गरजांपैकी पिण्याचे पाणी, आणि इतर जगण्याचे साधन यामध्ये आहे. याच्या प्राप्तीसाठीच वंचित घटकांचा संघर्ष वर्षानुवर्षे आपल्या भूमीत सुरू आहे. पांडू एका बाजूला गावगाड्याच्या विरोधात उभा आहे. तर दुसऱ्या बाजूला तो लोककलेचा वारसा असणारा तमाशा उभा करतो. आपल्या पुढील पिढीला शिक्षणाची दारे खुली करून देताना समाजालाही शिक्षणाचे महत्व पटवून देतो.

'फिरकी' या कादंबरीत फुले-आंबेडकरी विचारांचा प्रभाव स्पष्टपणे जाणवतो. आंबेडकरी विचारामधील शिक्षण, संघर्ष, स्त्रीला प्रतिष्ठा ही मूल्ये या कादंबरीने अधोरेखित केलेली आहेत. या कादंबरीचा नायक पांडुरंगच्या संघर्षाला आंबेडकरी विचारांचे अधिष्ठाने प्राप्त झाले आहे. त्यामुळे ही कादंबरी फुले आंबेडकरी जाणिवा प्रकट करताना दिसते. याबरोबरच या कादंबरीची भाषा ही तिचे सामर्थ्य ठरते. मातंग समाजाची गुप्त बोली या कादंबरीत आलेली आहे. त्यामुळे भाषिक वैविध्य हे या कादंबरीचे सामर्थ्य ठरते. वर्तमान काळात मराठी भाषा आणि संस्कृतीच्या दृष्टीने ही कादंबरी मौलिक ठरली आहे. स्त्रीवादाच्या अनुषंगाने विचार करता या कादंबरीत येणारी बाळका हे पात्र एकूणच पारंपरिक स्त्री चित्रणाला फाटा देऊन नव्या बंडखोरीचे दर्शन घडविते. बाळका त्या काळात केवळ पांडुला साथ देत नाही तर स्वतः मुलांच्या, नातवांच्या शिक्षणासाठी संघर्ष करते. तसेच गावपातळीच्या राजकारणातही प्रवेश करते. अशा स्वरूपाचे स्त्री चित्रण अभावनेच आढळते म्हणून या कादंबरीतील स्त्री चित्रण म्हणजे नव्या स्त्रीवादाची मांडणी करताना या कादंबरीतून सशक्त स्त्री चित्रण करून स्त्रीला सन्मान प्राप्त करून दिला आहे हेच या कादंबरीचे बलस्थान आहे.

नाटकातील आंबेडकरी स्पंदने :-

अरूण मिरजकरांनी कादंबरीप्रमाणे नाट्य लेखनही केलेले आहे. त्यांनी आजपर्यंत 'दि पिलर ऑफ सोशल डेमॉक्रसी', 'जोती म्हणे', 'निब्बाण', 'डॉलर', 'ब्लॅक नाईटस्', 'केसं', 'अंधारातली बाहुली' यासारखी नाटके लिहून रंगभूमीवर सादर केलेली आहेत. मुंबईतील बोधी नाट्य महोत्सवामध्ये तसेच प्रायोगिक आणि व्यावसायिक रंगभूमीवर निब्बाण, डॉलर, ब्लॅक नाईटस या नाटकांचे प्रयोग झालेले आहेत. मिरजकरांचा नाट्य प्रवास गेल्या पंधरा वर्षातील असला तरी त्यांनी आपला वैचारिक वारसा जोतीराव फुल्यांच्या 'तृतीय रत्न' या नाटकापासून सांगितला आहे. 'तृतीय रत्न' ते 'धम्मक्रांती' या सुमारे शंभर वर्षाच्या पहिल्या कालखंडात 'फुले-आंबेडकरी' नाट्य चळवळीच्या पाया भरणीचे काम झाले आहे. या काळातील नाटकांनी वास्तवतेची कास धरलेली आहे. त्यानंतरचा दुसरा कालखंड धम्मक्रांतीपासून सुरू होतो. विशेषत्वाने या कालखंडात धर्मांतर, दलित पँथरची चळवळ या महत्वाच्या घटना घडलेल्या आहेत. आंबेडकरी चळवळीमुळे आलेल्या आत्मभानामुळे फुले-आंबेडकरी साहित्य प्रवाह अधिक जोमदार आणि सकस झाला आहे. या कालखंडातील नाटककारांनी आंबेडकरी विचारांची ऊर्जा घेऊन स्वातंत्र्य, समता, बंधुता, माणुसकी या मूल्यांना साहित्यामधून अधोरेखित केले. याबरोबरच आपल्या समाजाचे दुःख, दैन्य, दारिद्र्य, वेदना, विद्रोह, नकार यांना साहित्यातून वाचा फोडली. या कालखंडात नाट्य क्षेत्रात लेखन करणाऱ्यामध्ये भि. शि. शिंदे, प्रेमानंद गज्वी, दत्ता भगत, रामनाथ चव्हाण, प्रभाकर दुपारे इत्यादींचा समावेश आहे. तर १९९१ च्या जागतिकीकरणापासून फुले आंबेडकरी नाटकाच्या तिसऱ्या पर्वाला सुरूवात होते. या कालखंडात जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यात निर्माण झालेले जातीय, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक प्रश्न व स्वचिकित्सा या विषयांनी नाट्यचळवळीस आकार प्राप्त करून देण्याचे काम काही मोजक्या नाटककारांनी केले आहे. त्यामध्ये सिध्दार्थ तांबे, भगवान हिरे, अशोक हंडोरे, राकेश शिर्के

महेंद्र सुके, स्वप्नील गांगुर्डे आणि अरूण मिरजकर यांचा समावेश होतो. उपरोक्त पार्श्वभूमीवर मिरजकरांच्या नाट्य लेखनाचा अभ्यास करावा लागणार आहे.

अरूण मिरजकरांची सर्वच नाटके आंबेडकरी विचारांनी प्रेरीत होऊन समकालीन प्रश्नांना भिडतात. कलात्मक प्रयोगशीलता, आशयभान, समाजभान या सर्वांचा समतोल त्यांच्या नाट्यलिखाणात जाणवतो. 'द पिलर ऑफ सोशल डेमॉक्रसी' हे त्यांचे नाटक सन २००२ मध्ये रंगभूमीवर आले. या नाटकामध्ये मिरजकरांनी राजर्षि शाहू महाराजांच्या वैचारिक चरित्राचे समर्पक असे नाट्य उभे केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ४ सप्टेंबर १९२१ च्या शाहू महाराजांना लिहिलेल्या महत्वपूर्ण अशा पत्रातील गौरवपूर्ण उल्लेखाचा वापर करून शाहू चरित्र नव्या आयामाने रंगभूमीवर सादर करण्यात मिरजकर यशस्वी झाले आहेत. या नाटकाच्या माध्यमातून मिरजकरांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दृष्टिकोनातून लोकशाहीचे आधारस्तंभ असलेले शाहू महाराज, प्रस्थापित ब्राह्मण वर्गातील दंभस्फोट करणारे जनतेचे राजे, सशक्त वैचारिक बुध्दिवादी शाहू महाराज उभे करण्यात ते यशस्वी झाले आहेत. रंगभूमीवर सादर झालेल्या मोजक्या आणि चांगल्या नाटकांच्यामधील हे एक वेगळे प्रयोगशील नाटक आहे.

'जोती म्हणे' हे जोतीराव फुले यांचे क्रांतिविचार मांडणारे मनोविश्लेषणात्मक धाटणीचे नाटक आहे. केवळ चरित्र मांडण्याचाच खटाटोप नाटककाराने केलेला नसून 'विचार' आणि 'अविचार' अशा काल्पनिक पात्रांच्या आधारे जोतीरावांची वैचारिक प्रगल्भता व त्यांनी केलेले समाज परिवर्तनाचे कार्य खऱ्या अर्थाने मांडलेले आहे. नाटककाराने या नाटकामध्ये केलेला विचार आणि अविचार या पात्रांचे प्रयोजन करून समाजातील निगेटिव्ह आणि पॉझिटिव्ह शेडस् नव्या प्रायोगिकतेतून नव्याने मांडलेल्या आहेत. या नाटकाच्या माध्यमातून नाटककाराने पहिल्यांदाच जोतीराव फुल्यांच्या विचारांची चिकित्सा आणि उपयोगिता स्पष्टपणे मांडलेली आहे. प्रस्थापित उच्चवर्णीयांच्या अन्यायाविरूध्द दंड थोपटून उठलेले जोतीराव, सत्यशोधक समाजाची स्थापना करणारे, परिवर्तनवादी जोतीराव, ऐतिहासिक, तात्विक ग्रंथ निर्माण करणारे ग्रंथकार, आधुनिक नाटकाचे शिल्पकार जोतीराव फुले अशा विविध पैलूंचे दर्शन या नाटकात प्रभावीपणे घडते.

बौध्द तत्वज्ञान आणि समकालीन सांस्कृतिक परीघ यांना थेट भिडणारे, नव्या शैलीतील आंबेडकरी नाटक म्हणजे अरूण मिरजकरांचे 'निब्बाण' हे नाटक होय. वर्तमानकालीन जटील बनलेल्या जातीय, धार्मिक प्रश्नातून मुक्त होण्याचा मार्ग म्हणजे 'निब्बाण'. या नाटकासंबंधी आपली वैचारिक भूमिका स्पष्ट करताना अरूण मिरजकर म्हणतात की, "वर्तमानाला सामोरे जाण्याची उर्मी बाळगूनच प्रवाहित व्हावं लागेल आणि हे प्रवाहित होणंही असं सुटं, मोकळं बेजबाबदारीचे असणार नाही. वर्तमानाला सामोरं जाताना भविष्याचं उदात्त ध्येय, भूतकाळातील बरे वाईट अनुभव, उज्ज्वल इतिहास, सकस क्रांतिकारक विचार चांगल्या परंपरा घेऊनच प्रवाहित व्हावं लागेल तरच निकोप आधुनिक जग निर्माण होईल."[२] हे जग म्हणजेच बुध्द आणि आंबेडकरांना अपेक्षित असणारे आधुनिक परंपरा अशी प्रायोगिक शैलीतील पात्रांची नाट्यानुभवता साकारून मिरजकरांनी वेगळ्या प्रकारची प्रयोगशीलता आविष्कारित केलेली आहे. या नाटकाचे दिग्दर्शक रवींद्र लाखे म्हणतात की "...हे नाटक बोधी नाटक आहे. बोधी म्हणजे ज्ञान. नुसते ज्ञान नव्हे. सम्यक ज्ञान. बोधी हा शब्द बुध्दाच्या तत्वज्ञानातील आहे त्या अर्थाने मिरजकरांकडे फिलॉसॉफिकल मन आहे."[३] या विचारानुसार निब्बाण या नाटकातून मिरजकरांनी बौध्द तत्वज्ञान या नाटकातून मांडले आहे.

''डॉलर' हे आजच्या समकालीन जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या राजकारण व त्यातील गुंता आपल्या अनोख्या शैलीने सोडविणारे नाटक आहे.'[४] अमेरिकेसारख्या प्रबळ राष्ट्राची भांडवलशाही, साम्राज्यवादी अहंकारी भूमिका व त्यामुळे संपूर्ण जगाला वेठीस धरणारी वर्चस्ववादी वृत्तीचा दंभस्फोट या नाटकात करण्यात आलेला आहे. सद्दाम हुसेनची हुकुमशाहीवृत्ती व तिच्या विरोधात अमेरिकेसारख्या मित्र राष्ट्रांची मोहिम ही राजकीय खेळी विकसनशील राष्ट्रांच्या गुलामगिरीस कारणीभूत ठरते. त्याचबरोबर संपूर्ण भारतातील देशप्रेमी बहुजन कष्टकरी जनता व तिला नागवणारे उच्चवर्णीय, भांडवलदार, दलाल यांच्यातील संघर्ष कबड्डी सारख्या खेळाच्या माध्यमातून रंगभूमीवर साकारण्याचा प्रयत्न 'डॉलर' मध्ये केलेला आहे. शिवाय या प्रश्नाचे समर्पक उत्तर देणारी आंबेडकरी विचारधारा नाटककाराने प्रमाण मानली आहे असे दिसते.

''ब्लॅक नाईटस' हे अरूण मिरजकरांचे बहुचर्चित नाटक नुकतेच मराठी रंगभूमीवर आले आहे. या नाटकाचे वैशिष्ट्य म्हणजे नाटककाराने घेतलेला जागतिक राजकारणाचा व कलेचा परामर्श होय.'[५] या नाटकामध्ये नाटककाराने आधुनिक काळातील जागतिक स्तरावरील वर्णव्देषातील दुटप्पीपणातील दांभिकता अधोरेखित केली आहे. 'ब्लॅक नाईटस' या नाटकामध्ये

जागतिक पार्श्वभूमीवर कृष्णवर्णीयांचा संघर्ष भारतातील चातुर्वण्यव्यवस्थेच्या दलित सवर्ण संघर्षाच्या लढ्याशी नाते सांगणारा आहे. अर्थात देशकालपरत्वे त्याचे कंगोरे थोडे वेगळे असले तरी शोषण व दमणाची वृत्ती तीच आहे हा धागा पकडून अरूण मिरजकरांनी ब्लॅक नाईटस हे नाटक रचले आहे. या नाटकाच्या सुरूवातीलाच रिॲलिटी शो मधील एक भारतीय नायिका वर्णद्वेषाबद्दल माध्यमांसमोर आकांड तांडव करते. या ठिकाणीच ती एका संवेदनशील दिग्दर्शकांच्या नजरेत येते येथूनच तिच्या या दांभिकतेचा बुरखा तो कृष्णवर्णीय दिग्दर्शक फाडतो. आपल्या एका आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सिनेमाचा बनाव करून तिला तो करारबध्द करतो. या सिनेमाच्या तालमी दरम्यान अनेक स्व अनुभवाची ओळख कृष्णवर्णीय व दलितांची झालेली क्रौर्य आणि पिळवणुकीचा दाखला तो देत राहतो व इथेच ती नायिका बेनकाब होते. तिच्यातील जातीय व्देष, प्रसिध्दीची हाव, पैशासाठी कोणत्याही स्तराला जाण्याची तयारी असे एकूणच असमतेची तत्वे समोर येतात. हा पाखंडीपणा उघड करण्याचा प्रयत्न या नाटकात होतो.

हे नाटक दोनच पात्रांमध्ये रंगमंचावर अवतरते. प्रायोगिक रंगभूमीवर नवीन आशयानुसार आपले वैशिष्ट नोंद करते. आजच्या काळाचा नवीन प्रश्न जुन्या अनुभवासह अत्यंत गंभीपरणाने मिरजकरांनी या नाटकात मांडलेला आहे. शोषित आणि शोषकामधील हा संघर्षाचा बिंदू समतेच्या परिघाला कवेत घेतो व स्वतःची ओळख सिध्द करतो. या नाटकाच्या निमित्ताने फुले-आंबेडकरी प्रवाहातील पारंपरिकपणाचा आणि तोच तो पणाचा आरोपही पुसून टाकण्यात हे नाटक यशस्वी झाले आहे याचे महत्वाचे कारण हे नाटक जातीय प्रश्न जागतिक परिमाणाच्या अनुषंगाने मांडत आहे.

निष्कर्ष :-

एकंदरीतच अरूण मिरजकरांचे साहित्य आंबेडकरी विचारांचे आयाम घेऊन सामाजिक प्रश्नांची उकल करणारे आहे. विशेषतः त्यांची नाटके आशयघन असून ती स्थल काळाच्या मर्यादा ओलांडणारी आहेत. आजची मराठी रंगभूमी जी आज धंदेवाईक बनून आवर्तात सापडलेली आहे. तिला नवा जोम, नवा विचार देण्याचे काम अरूण मिरजकरांची नाटके करीत आहेत. हेच अरूण मिरजकरांच्या लेखणीचे सामर्थ्य मानले पाहिजे.

संदर्भ टिपा

१) रवींद्र पाथरे : लोकरंग दै. लोकसत्ता दि.१२/१०/२०१३
२) अरूण मिरजकर : मुलाखत दि. १२/०१/२०१५
३) रवींद्र लाखे : अखिल मानवजातीच्या आयडेंटिटीचा प्रश्न 'निब्बाण', अरूण मिरजकर प्रज्ञा, प्रबोध प्रकाशन सांगली. २००८.
४) विवेक खरे : मुलाखत दि. २०/०४/२०१५
५) रवींद्र पाथरे : 'ब्लॅक नाईटस्' शोषणाचा वर्तमान पंचनामा... 'ब्लॅक नाईटस्', - अरूण मिरजकर निर्मिती संवाद, कोल्हापूर २०१३.

शशिकांत खिलारे
मराठी विभाग प्रमुख श्रीमती चंपाबेन बालचंद शाह महिला महाविद्यालय सांगली.